सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत,
# आरोग्य सेवा आयुक्तालय यांचे अखत्यारीतील
# गट-क व ड संवर्गातील सरळसेवा भरती २०२३

............................................................................................................

दिनांक ०७.१२.२०२३

## प्रसिध्दीपत्रक

**विषय -चुकीचे प्रश्न, प्रश्नांचे चुकीचे पर्याय व चुकीच्या उत्तरास गुणदान संबंधी प्राप्त आक्षेप/हरकतीकरिता शुल्क आकारणी.**

आरोग्य सेवा आयुक्तालय अंतर्गत गट-क व ड संवर्गातील परीक्षा-२०२३ राज्यातील २९ जिल्हयामध्ये १०८ परीक्षा केंद्रामध्ये दिनांक ३०/११/२०२३ ते ०७/१२/२०२३ व दिनांक १२/१२/२०२३ या तारखांना आयोजित करण्यात आलेली आहे. परिक्षा झाल्यानंतर मे. टि.सी.एस.-आय.ओ.एन. यांचेकडून दि.१५-१२-२०२३ पासून संबंधित उमेदवाराच्या लॉगिन आय.डी. वर त्या उमेदवाराने सोडवलेली उत्तर पत्रिका (Answer Sheet) व अपेक्षित असलेली उत्तर तालिका (Answer Key) उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यावर संबंधित उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या उत्तर तालिका (Answer Key) च्या अनुषंगाने चुकीचे प्रश्न, प्रश्नांचे चुकीचे पर्याय व चुकीच्या उत्तरास गुणदान वगैरे संबंधित आक्षेप / हरकत असल्यास सदर आक्षेप नोंदविण्यासाठी दि.१८-१२-२०२३ ते दि.२०-१२-२०२३ या कालावधीत टि.सी.एस. कडून लिंक खुली करण्यात येणार आहे. सादर केलेल्या आक्षेप / हरकतीबाबत टि.सी.एस.चे प्रश्नोत्तर समितीकडून योग्य तो निर्णय घेण्यात येईल. टीसीएस कंपनीकडून आक्षेप / हरकत सादर करणेसाठी प्रति आक्षेप / हरकती करीता रु.१००/- प्रमाणे फी आकारण्यात येते. आक्षेप / हरकत योग्य असल्यास सदरची फी परत करण्यात येते व आक्षेप अयोग्य असल्यास फी परत केली जाईल.

संचालक,आरोग्य सेवा पुणे.